# वॉरियर तायक्वांदो अकादमी
योद्धा बना, चिंता सोडा!
तज्ज्ञ ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांकडून प्रशिक्षण
आजच जॉईन करा

शाखा : जुईनगर, सानपाडा, वाशी, कोपरखैरणे
9821143012 @warriortaekwondoacademy



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

तुमच्या सहभागा शिवाय
तुम्ही यशस्वी होणार नाही.
आणि तुमच्या सहभागा सोबत
तुम्ही कधी अपयशी होणार नाही.


वर्ष : ०५ | अंक : ०२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१७ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056



**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**


## सावधान! पुढील चार दिवस धोक्याचे, राज्याच्या 'या' भागांत अतिवृष्टीचा इशारा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** राज्यात जवळपास सर्वच ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची धुवाधार धुवाधार बॅटिंग सुरु आहे. परिणामी नदी नाले ओसंडून वाहत असून पुराचा धोका वाढला आहे. मुसळधार पावसामुळे दैनंदिन जीवनाला फटका बसला, नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. यातच आता चिंतेत भर टाकणारी बातमी समोर आली आहे, राज्यात अनेक जिल्ह्यांत पुढच्या दोन दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, हवामान विभागाने या भागांत रेड अलर्ट जारी केला आहे.

हवामान विभागाच्या मुंबई प्रादेशिक केंद्राकडून पुढील चार दिवसांचे अंदाज जारी करण्यात आले आहे. १६ ते २१ ऑगस्टदरम्यान विजांच्या कडकडाटासह अतिवृष्टीचा इशारा देण्यात आहे. अंदाजानुसार, कोकणासह घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यातही जोरदार पाऊस बसरणार असल्याचा अंदाज आहे.

मुंबईसह पुण्यात उद्या १७ ऑगस्टला रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. किनारपट्टी भागात अतिवृष्टीची शक्यता आहे. त्यामुळे पुढील चार दिवस किनारपट्टी लगतच्या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. तर विदर्भातही काही जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट असणार आहे. तर सोमवारी १८ ऑगस्टला रत्नागिरीसह पश्चिम महाराष्ट्रात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान उत्तर, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही भागांतही पावसाची स्थिती सामान्य राहणार आहे. १८ आणि १९ ऑगस्टला या भागांत यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मध्यम ते जोरदार स्वरुपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. तर २० ऑगस्टला केवळ किनारपट्टीभागासह पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पावसाची शक्यता आहे. किनारपट्टी भागात ताशी ५० ते ६० किमी एवढा वाऱ्याचा वेग राहणार आहे. दरम्यान, मुंबई उपनगरामध्ये पावसाने दमदार हजेरी लावली आहे. गेल्या महिन्याभरापासून लपंडाव करणाऱ्या पावसाने शनिवारी रात्रीपासून दमदार हजेरी लावली. उपनगरांतील कुर्ला , घाटकोपर , सायन , मुलुंड , ठाणे इथे मुसळधार पाऊस सुरू आहे. पावसामुळे सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे.

### संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या जयंती वर्षानिमित्त

## २२ किलोचा सुवर्ण कलश समाधी मंदिरावर चढविला



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, आळंदी (पुणे) :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुवर्णकलश पूजन आणि श्री ज्ञानेश्वरी(सार्थ) ऑडिओ बुक विविध भाषेत उपलब्ध असलेल्या श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या संकेतस्थळाचे उद्धाटन शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात आले. मान्यवरांच्या उपस्थितीत भाविकांच्या वर्गणीतून तयार करण्यात आलेला हा २२ किलोचा सुवर्ण कलश समाधी मंदिरावर चढविण्यात आला. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते महाद्वार जीर्णोद्धार कार्यारंभ पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते सुवर्णकलश आणि महाद्वारासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर महाराजांनी पसायदानाद्वारे अखिल विश्वाच्या कल्याणाची भावना मांडली आहे. ज्ञानेश्वरीतील हा विश्वात्मक विचार भारतीय संस्कृतीचे मूळ असून तो जगाला मार्गदर्शक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आळंदी येथे सांगितले. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्ण जयंती दिनानिमित्त आयोजित संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिरावर सुवर्ण कलशारोहण समारंभासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, ह.भ.प. मारुती महाराज कुरेकर, ह.भ.प. नारायण महाराज जाधव, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, बापूसाहेब पठारे, महेश लांडगे, बाबाजी काळे, देवेंद्र पोटे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री फडणवीस म्हणाले, आपल्या संस्कृतीतील प्राचीन मूल्ये जपण्याचे श्रेय वारकरी संप्रदायाला आहे. ही मूल्य विचारांची परंपरा पुढच्या पिढीपर्यंत नेल्याने आम्ही परकीय आक्रमण होत असताना राजकीय गुलामगिरी स्वीकारली, पण वैचारिक गुलामगिरी स्वीकारली नाही. वारकरी परंपरेने आणि संतांनी जात, धर्म भेदामुळे गुलामगिरीत जाणाऱ्या समाजात ऐक्य निर्माण करण्याचे कार्य केले. माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून हीच शिकवण दिली आहे, २१ वर्षांच्या जीवनात त्यांनी दिलेला विचार आपल्याला शतकानुशतके मार्ग दाखविणारा आहे. म्हणूनच समाधी मंदिरात आल्यावर चांगले काम करण्याची ऊर्जा मिळते, असे त्यांनी सांगितले. विचार आणि तत्वज्ञानाचा निर्मळ प्रवाह असलेली भारतीय सभ्यता सर्वात जुनी सभ्यता आहे हे जगाने मान्य केले असल्याचेही ते म्हणाले.

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा देऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, अर्जुनाला कर्म मार्ग दाखविण्यासाठी भगवान योगेश्वराने गीता सांगितली, गीतेचे मराठीत विवेचन करणाऱ्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या समाधी मंदिरावर सुवर्ण कळस आजच्या दिवशी चढविला जाणे हा एक सुवर्णयोग आहे. भक्तांनी दान नव्हे तर समर्पण केल्याने हा सुवर्ण कलश चढविला गेला. सुवर्ण कलशासोबत महादजी शिंदे यांनी उभारलेल्या महाद्वाराचा जीर्णोद्धार केल्याने त्याला मूळ स्वरूप प्राप्त होईल आणि मंदिर परिसराच्या पावित्र्यात भर पडेल.

भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान हे जगातले सर्वोत्तम तत्त्वज्ञान असून ते जगात स्वीकारले जात आहे. माऊलींनी ९ हजार ओव्यांच्या माध्यमातून मांडलेले हे ज्ञान ऑडिओ बुकच्या माध्यमातून सर्व भाषेत उपलब्ध होणार असल्याने ते जगभरात पोहोचेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मंदिराच्या महाद्वारातून भक्त माऊलीचा गजर करीत पुढे जातात. ही वारकरी परंपरा फार मोठी आहे आणि ती पुढे नेत असताना समाधी मंदिरावर सुवर्ण कलश चढविला जाणे ही महत्त्वाची घटना आहे. भाविकांच्या योगदानामुळे या क्षणाचे साक्षीदार होण्याचे भाग्य सर्वांनाच मिळाले. वारकऱ्यांसाठी ज्ञानोबा हा श्वास आणि आळंदी ही काशी आहे, अलंकापुरी म्हणून परिचित असलेल्या आळंदीला मराठीसाठी आणि भागवत धर्मासाठी महत्त्वाचे स्थान आहे. आज नव्या संकेतस्थळाच्या माध्यमातून भागवत धर्मातील विचार प्रसाराची ही परंपरा पुढे नेण्यासाठी ज्ञानेश्वरी ऑडिओ बुकचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. ज्ञानेश्वरीतील ओव्यांच्या दोन ते तीन मिनिटांच्या ऑडिओ क्लिप तयार करून पुढच्या पिढीपर्यंत हा विचार अधिक प्रभावीपणे पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, डॉ. भावार्थ देखणे, योगी निरंजन नाथ, ॲड. रोहणी पवार, चैतन्य कबीर, पुरुषोत्तम पाटील आदी उपस्थित होते.

## 'दैनिक अक्षराज' चा चतुर्थ वर्धापन दिन दणक्यात साजरा...


















**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, आळंदी (पुणे) :** दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी आळंदी देवाची येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर जवळ असलेल्या आराधना हॉटेलमध्ये सकाळी ११ वाजता दैनिक अक्षराज वृत्तपत्राचा चतुर्थ वर्धापन दिन मोठ्या दणक्यात साजरा झाला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे भगवानराव वैराट (संस्थापक अध्यक्ष झोपडपट्टी सुरक्षा दल) लाभले होते. दैनिक अक्षराजचे मुख्य संपादक विनोद गोरे, सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण गोरे सर्व पत्रकार बांधव अक्षराज मीडिया परिवार आणि आळंदीकर बांधव उपस्थि होते. प्रमुख पाहुणे भगवानराव वैराट यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी म हाराजांच्या मूर्तीची पूजा कौन अभिवादन करण्यात आले. तसेच दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. प्रमुख पाहुणे यांनी पत्रकारांना चांगले मार्गदर्शन केले. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा ही दिल्या.

भगवानराव वैराट (संस्थापक अध्यक्ष झोपडपट्टी सुरक्षा दल) यांच्या हस्ते सर्व पत्रकारांना पुरस्कार देण्यात आले. विनोद शनिवार वास्कर (आदर्श पत्रकार पुरस्कार), वसंत राधवण (आदर्श पत्रकार पुरस्कार), भानुदास गायकवाड (उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार), शिवाजी औसेकर (उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार), सुनील क्षीरसागर (उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार), राहुल शिंदे (उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार), विनोद धुरंधर (उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार) देऊन या सर्वांना सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारात शाल, श्रीफळ, पेन, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, वृक्ष असे पुरस्कार वितरणाचे स्वरूप होते. दहावी, बारावी, पदविका मध्ये उत्तीर्ण झालेल्या पत्रकारांच्या मुलांनाही गुणगौरवण्यात आले. प्रमुख पाहुणे भगवानराव वैराट, विनोद कैलास गोरे, सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण गोरे आणि सर्व पत्रकारांच्या हस्ते चतुर्थ वर्धापन दिनाच्या अंकाचे अनावरण करण्यात आले. तसेच संपूर्ण टीमला प्रमुख पाहुण्यांनी पाचव्या वर्षात पदार्पण करीत असल्याबद्दल खूप खूप शुभेच्छा दिल्या. गरीब फाटक्या नागरिकांच्या बातम्या इतर ठिकाणी लागत नसतात. मात्र दैनिक अक्षराज हे सर्व गरीब जनतेच्या बातम्या अक्षराज मध्ये प्रकाशित करते. त्या गोरगरीब जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम करते. दैनिक अक्षराजच्या अंकात लागलेल्या बातम्यांची दखल सरकार घेत आहे. त्यांच्या बातम्या चा इम्पॅक्ट दिसत आहे. सरकारी अधिकारी सुद्धा दखल घेत आहेत. त्यामुळे सामान्य जनतेचे प्रश्न सुटत आहेत.

दैनिक अक्षराज वृत्तपत्राने चार वर्षात चांगले यश प्राप्त केले आहे. आरोग्य केंद्रात चांगल्या सुविधा मिळाव्या, कचऱ्याच्या समस्या सोडवण्यासाठी, चांगले रस्ते मिळावे यासाठी, महिलांवर होणारे अत्याचार थांबवण्यासाठी,विद्युत समस्या सोडवण्यासाठी, भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवण्याचं काम आणि भ्रष्टाचार बाहेर करण्याचं काम, राशनच्या समस्या सोडवण्यासाठी, बंद पडलेले पद दिवे चालू करण्यासाठी, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी, विद्यार्थ्यांना शिक्षणाचे हक्क मिळवण्यासाठी, रस्त्यावरचे अतिक्रमण हटवण्यासाठी, शासकीय भूखंडावर केलेले अतिक्रमण हटवण्यासाठी, बेघर होणाऱ्या रहिवासांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी, पाण्याच्या समस्या सोडवण्यासाठी, नागरिकांवर होणाऱ्या भाड हल्ला विषयी, कामगारांना त्यांच्या हक्क मिळवण्यासाठी, तलावाचे सुशोभीकरण करण्यासाठी, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी, वृक्षारोपण करण्यासाठी, अनाधिकृत बांधकाम विषयी, अशा अनेक विषयांवर त्यांनी बातम्या लावून सामान्य जनतेला न्याय देण्याचे काम केलं आहे. त्यामुळे त्यांना चांगले यश लाभले आहे असे प्रमुख पाहुणे म्हणाले. असेच यश इथून पुढेही अक्षराज वृत्तपत्राला मि ळत राहो या सदिच्छा भगवानराव वैराट यांनी भाषणाच्या शेवटी दिल्या.

आभार प्रदर्शन सहसंपादिका प्राजक्ता चव्हाण गोरे यांनी केले. उपस्थित म ान्यवर व पाहुण्यांनी तसेच मित्र परिवाराने अक्षराज वृत्तपत्राचे कौतुक केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




## हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिवस म्हणून साजरा केला जातो. जगभरात हत्तींची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. त्वचा आणि हस्तिदंती वस्तुंसाठी तस्करांकडून हत्तींची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. एका अंदाजानुसार दररोज अवैध शिकारीमध्ये किमान १०० हत्ती मारले जातात म्हणून वर्ल्ड एलीफंट फाऊंडेशनने २०११ सालापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्ती दिवस अर्थात वर्ल्ड एलीफंट डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली.

या दिवसाचे औचित्य साधून हत्तीचे पर्यावरणीय तसेच जीवशास्त्रीय महत्व याविषयी जनजागृती करण्यात येते. जगभरात आफ्रिका आणि आशियायी देशात हत्तींची संख्या सर्वाधिक आहे. जगातील ९० टक्के हत्ती या दोन खंडातच आढळतात पण आता या दोन खंडातही हत्तींचे प्रमाण घटू लागले आहे. अवैध शिकारींवर जर वेळीच अंकुश लावला नाही तर पृथ्वीवरून हत्ती नामशेष होऊ शकतात आणि जर पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर त्याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होऊ शकतो. पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली आहे.

हत्ती कमी झाल्यास निर्माण होणाऱ्या धोक्यासंदर्भात सेंट लुईस विद्यापीठातील संशोधकांनी केलेले संशोधन नेचर जिओ सायन्स या नियतकालिकेत छापून आले होते. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर जगभरातील पर्यावरण व वन्यजीवप्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम हाती घेतली. जगभरात ही मोहीम आता जोर धरू लागली आहे. पृथ्वीवरील सर्वात महाकाय व सर्वात बलवान शाकाहारी प्राणी म्हणून हत्तीची गणना होते. हत्तीच्या प्रचंड वजनदार आकारमानामुळे जंगलात एकप्रकारे ते बुलडोझरचे काम करतात. त्यांच्या या चालण्यामुळे ते जंगलात नव्या वाटा निर्माण करतात. गवत व विविध वृक्ष वेलिंच्या परागीभवनात हत्तींच्या हालचालींचा मोठा वाटा असतो. ते गवत तुडवतात. विविध जातींच्या झाडांची फळे आणि पाने खातात. काही वेळा ते जंगलातील वठलेली झाडे धक्का देऊन पाडतात. या सगळ्यांच्या त्या जंगलाच्या वनक्षेत्राच्या इकोसिस्टीमवर परिणाम होत असतो.

हत्ती जंगलात असल्यामुळे झाडांची संख्या नियंत्रणात राहते. जंगलात वेगाने वाढणाऱ्या वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत असतात. विशेषतः आफ्रिकेतील हत्तींबाबत करण्यात आलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की हत्ती अशा वेगाने वाढत असलेल्या वनस्पतींची पाने खात असल्याने वातावरणात सोडण्यात येणारा कार्बन डायऑक्साइड कमी प्रमाणात सोडला जातो. मध्य आफ्रिकेतील कांगो प्रजासत्ताकाच्या अख्यातीरित येत असलेल्या जंगलात याबाबत संशोधन केले असता वरील निष्कर्ष संशोधकांनी काढले आहे. त्यामुळे हत्तींची संख्या वाढत राहिली तरच वातावरणातील प्राणवायू टिकून राहील आणि कार्बनचे प्रमाण कमी होईल हे जाणूनच पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम सुरू केली आहे.

हत्ती वाचवणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सर्व देशांनी सहभाग नोंदवायला हवा. पर्यावरण वाचवायचे असेल आणि वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करायचे असेल तर हत्तींची अवैध शिकार रोखली पाहिजे. हत्तींची शिकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. हत्ती वाचेल तरच वातावरण वाचेल, पर्यावरण वाचेल. हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा.

# सताले जिंदगी, तुझे जितना सताना है!

सताले जिंदगी तुझे जितना सताना है!
हमे कोनसा दुबारा इस धरती पर आना है!

हा शेर मी रील स्क्रोल करताना ऐकला आणि लगेच पेन उचलला... अनेक लोक रोजच्या जगण्याने त्रस्त आहेत. घरातील चूल पेटण्यासाठी, आजारपणाच्या उपचारांसाठी, मुलांमुलींच्या शिक्षणासाठी आणि एकूणच सन्मार्गाने जगण्यासाठी त्यांना अनेक अडथळे येतात. सर्व काही सन्मार्गाने मिळवायचं हा त्यांचा बाणा त्यांचा जीवन संघर्ष कठीण करत असतो . स्वाभिमान गमावता कामा नये, असा विचार करून जगणाऱ्यांना जीवनात अनेक अडचणी, संकटे येतात.दृष्ट लोक या लोकांच्या मार्गात काटे पेरतात. निसर्गही त्यांची परीक्षा घेत राहतो. नियतीच्या पुढे अनेक वेळा त्यांना गुडघे टेकावे लागतात. नदीला पूर आला की, पाण्यात भवरे तयार होतात. त्या बोहऱ्यात अडकलेली कोणतीही वस्तू गोल गोल फिरत तळाशी जाते; त्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला जीवनात अनेक बाजूंनी



संकटे येतात. सर्व मार्ग बंद झालेले वाटतात, आणि सर्व दोर कापलेले वाटतात. जीवन इतके त्रासदायक बनते की ती व्यक्ती रसातला जाते.अशा लोकांसाठी वरचा शेर तंतोतंत लागू होतो...

याउलट, काही लोक कायमचे ठाण मांडून या पृथ्वीतलावर राहायचं आहे, असं समजून पद, संपत्ती, प्रतिष्ठा, सत्ता ` या गोष्टी मिळवण्यासाठी जंग जंग पछाडत राहतात. १०० वर्षे, २००-३००... एक हजार नव्हे, तर लाखो,करोडो वर्षे आपण या पृथ्वीवर चिरकाल राहणार आहोत असे त्यांनी वाटत असते. अशा लोकांचा भौतिक गोष्टींचा संचय करण्याचा प्रयत्न अफाट असतो. साम-दाम-दंड-भेद अशा कोणत्याही मार्गाने ते इतरांच्या डोक्यावर पाय ठेवून वर जाण्यासाठी धडपडतात. नीती-आनीती, चांगले-वाईट, खरं-खोटं, पाप-पुण्य, कायदेशीर-बेकायदेशीर ` कोणताही मार्ग ते वापरतात. श्रीमंत आणि सत्ताधारी लोकांना स्वर्ग दोन बोटे उरल्यासारखं वाटतं. पण सामान्य माणूस मात्र गरिबीत खितपत पडतो.संसारासाठी लागणारे सामान जुळवण्यातच त्याची आख्खे उमेदीचे आयुष्य खर्ची पडते.दिखाऊपणाच्या या समाजात पाप भाग्यशाली झाले आहे आणि पुण्य मात्र दुर्दैवी झाले आहे. खर्याची दुनिया नाही असं म्हणत गप्प गुमानं जगणारे आपल्या आजूबाजूला मोठ्या संख्येने दररोज भेटतात.

शेवटी, शोषित, पीडित आणि सन्मार्गाने जाणाऱ्या माणसाने आपल्या जीवनातील संघर्ष सुशिक्षित, सुसंस्कृत पद्धतीने केला पाहिजे. सूडाची भावना न बाळगता उन्नतीचा मार्ग निवडला पाहिजे. जीवन संघर्ष कितीही टोकदार झाला तरी, समाप्तीचा मार्ग न निवडता ` उषःकाल होता होता, काळरात्र झाली अरे पुन्हा आयुष्यांच्या पेटवा मशाली! ` असे म्हणत अंधाऱ्या रात्रीनंतर सोनेरी पहाट उगवेल, याची खात्री बाळगून लढत राहिलं पाहिजे.

जीवनात प्रत्येक गोष्ट आपल्या मनासारखी होणार नाही, ही जाणीव प्रत्येक पावलावर ठेवावी. संघर्ष, धैर्य आणि आशेचा संगम आपल्या जीवनाला अर्थ देतो.



-किशोर जाधव
सोलापूर
मो.९९२२८८२५४१

# पाटण अर्बन बँक प्रगतीपथावर : माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१६, पाटण :** अत्यंत कष्टातून आपल्या बँकेची निर्मिती झाली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून बँकेची वाटचाल सुरू आहे. स्पर्धेच्या युगात बँकेचे नाव आणि अस्तित्व टिकवायचे असेल तर नवनवीन धोरणांना सामोरे गेले पाहिजे आणि आपण जातही आहोत. संचालक, सभासद, ग्राहक, कर्मचारी यांच्या सहकार्यामुळेच आज आपली बँक प्रगतीपथावर आहे. आहे. भविष्यातही सर्वांच्या सहकार्याने आपली बँक प्रगती करत राहील, असा विश्वास माजी सार्वजनिक बांधकाम व पर्यटन मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी व्यक्त केला.

दि पाटण अर्बन को ऑप बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवारी श्रीराम मंदीर पाटण येथे पार पडली याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सातारा जिल्हा बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, बँकेचे चेअरमन बाळासाहेब राजेमहाडीक, व्हा चेअरमन धनंजय ताटे, मुख्य कार्यकारी अधिकारी माधव कपिलेश्वर, व्यवस्थापक के. आर. शिंदे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष ऍड. अविनाश जनुगडे, दूध संघाचे अध्यक्ष सुभाषराव पवार, माजी सभापती राजाभाऊ शेलार, सह्याद्री कारखाना संचालक अण्णासाहेब पाटील, श्रीराम नागरी पतसंस्थेचे चेअरमन हिंदुराव सुतार, कोयना कृषकचे अध्यक्ष नारायण सत्रे, वंदना सावंत, कविता हिरवे यांची प्रमुख उपस्थिती होती.



सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, दोन वर्षे लाभांश देता आला नव्हता. मात्र आज बँकेने शुन्य टक्के एनपीए गाठला आहे. त्यामुळे सभासदांना सात टक्के लाभांश वाटप करण्याचा निर्णय झाला आहे. आपली बँक अत्यंत चांगल्या प्रकारे सुरू असून दोनशे कोटीकडे वाटचाल सुरू आहे. बँकेला यावर्षी सर्वात जास्त नफा झालाआहे. सर्व संचालक यांची जबाबदारी व दूरदृष्टीने बँकेची वाटचाल सुरू आहे. मात्र बँके कर्ज देते त्यावेळी वसुली करताना वाईटपणा बँकेला घ्यावा लागतो. घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करून सर्वांनी बँकेच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे. दिवसेंदिवस रिझर्व्ह बँकेच्या नियमात बदल होत असून काही बंधने आहेत ती आपल्याला पाळावीच लागतील. लाभांश टेतानाही रिझर्व्ह बँकेला विचारावे लागते. आठ वर्ष संचालक पदावर राहता येणार नाही हे रिझर्व्ह बँकेचे कडक नियम आहेत. सध्या सर्व व्यवहार डिजिटल झाले आहे. शहरात विविध बँका येत आहेत. स्पर्धेच्या युगात लोकांना वेगवेगळ्या सुविधा द्याव्या लागणार आहेत. बँकिंग क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान येत असून भविष्यात युवकांपर्यंत ते तंत्रज्ञान पोहचवले पाहिजे तरच आपण टिकू. व्यवसायवाढीशिवाय पर्याय नाही. वेगवेगळ्या सुविधा देणे गरजेचे आहे. सभासद, संचालक, लोकांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न करू, असे त्यांनी सांगितले.

प्रास्तविकात बाळासाहेब राजेमहाडीक म्हणाले, बँकिंग क्षेत्रातील झपाट्याने होणारे बदल, तंत्रज्ञानाची प्रगती आणि ग्राहकांच्या अपेक्षांत झालेली वाढ लक्ष्यात घेता आपली बँक आधुनिक सेवा ग्राहकहीत जोपासत आहे. बँकेने चांगली वसुली करून पहिल्यांदाच शून्य एनपीए ठेवण्यात यश मिळवले आहे. तत्पर सेवेमुळे या आर्थिक वर्षात बँकेला ११३.२९ लाख निव्वळ नफा झाला आहे. त्यानुसार नफ्यातून ७ टक्के लाभांश वाटपाचा निर्णय घेतला आहे. बँकिंग क्षेत्रातील नवनवीन बदल स्वीकारत आपली बँक वाटचाल करत आहे. बँकेच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करून आगामी काळात नवनवीन संकल्पना , ग्राहक केंद्रित धोरणे व चिरंतन विकास या त्रिसूत्रीच्या आधारावर आम्ही वाटचाल करत राहू, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी राजाभाऊ शेलार यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी नियमित कर्जफेड करणाऱ्या व्यक्तींचा बँकेच्यावतीने सत्कार करण्यात आला. चेअरमन बाळासाहेब राजेमहाडीक व व्हा चेअरमन धनंजय ताटे यांनी स्वागत केले. मुख्य कार्यकारी अधिकारी माधव कपिकेश्वर यांनी नोटीस वाचन केले. समीर कदम यांनी आभार मानले. सभेस धैर्यशील पाटणकर, दिपकसिंह पाटणकर, ऍड. ए. पी. पाटील, नानासाहेब क्षीरसागर, दिनकरराव घाडगे, दिलीपराव मोटे, राजाभाऊ काळे, बबनराव कांबळे, बापूराव जाधव, पंकज गुरव यांच्यासह सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक उपस्थित होते.

## इंद्रधनू

निळा घन होऊन बरसतोस माझ्यावरती
तेव्हा तूझ्या धो - धो बरसणाऱ्या सरी
समर्पणाचा खरा अर्थ सांगत असतात मला

चिंब चिंब होऊन जातो रोम रोम माझा
आणि भिजूनी जातो मनाचा काना कोपरा
तेव्हा तो ओलावा प्रेमात शिल्लक न
राहण्याची
जणू शपथ च देत असतो मला

हा थंड गारवा शहारून टाकतो तनाला
आणि सांगितबद्ध करतो श्वासानां
तेव्हा पाना पानांतुन
टपकणारा तुझा एक एक थेंब
गीत बहाल करत असतो सृष्टीला

देणे हीच तुझी नियती असे सांगून टाकतोस
झाडा - वेलींना तू असा समर्पित होऊन
शून्य होतोस,
तूझ्या पाऊलखुणातून सृजनाचे सोहळे
साजरे करतोस
अरूपातून रूपांचे महामेळे उभे करतोस
आणि

नीरभ्र आसमन्नतात मला नव्याने भेटतोस
इंद्रधनू होऊन आणि सांगत राहतोस -
निर्व्याज प्रेम नवजीवन देते
मुक्तदान जीवनाला सप्तरंगांनी भरून काढते.

- डॉ मीरा निचळे
वर्धा.

# अटलबिहारी...




कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची काल १६ ऑगस्ट रोजी पुण्यतिथी होती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श

यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिका त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले.

उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
मो.९९२२५४६२९५

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### विसापुरात अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार प्रदान




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, विसापूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर तालुक्यातील विसापूर ग्रामपंचायत तर्फे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून कर्तबगार महिला म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सन्मान पुरस्कार अंगणवाडी सेविका रेखा ढेंगळे व प्रिया ठाकूर यांना प्रदान करून सन्मानित करण्यात आले. पुरस्काराला दाखल सन्मानपत्र, शाल, स्मृतिचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्याचप्रमाणे चिंतामणी माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद हायस्कूल येथील दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक योगदानाबद्दल गौरव करण्यात आला. विसापूर ग्रामपंचायत प्रांगणात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच वर्षा कुळमेथे, उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, माजी सरपंच बंडू गिरडकर, चिंतामणी कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत दोंतुलवार, जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक अरविंद चौधरी, विसापूर पोलीस चौकीचे संतोष एनगंदेवार, वैद्यकीय अधिकारी डा.नायर, सत्कारमूर्ती रेखा ढेंगळे, प्रिया ठाकूर, जि.प.हायस्कूलचे पुरस्कार प्राप्त गुणवंत विद्यार्थी पलक रमेश आत्राम, गौरी धनराज शेडमाके, प्रितम शंकर तेलंग, चिंतामणी माध्यमिक विद्यालयाचे यश राजेंद्र शेंडे, प्रिया किशोर गिरडकर, प्रांजली प्रकाश पावडे यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ प्रदान करून गौरव करण्यात आला. तत्पूर्वी येथील मुख्य शासकीय ध्वजारोहण सरपंच वर्षा कुळमेथे यांच्या हस्ते करण्यात आले. गावातील आशा कार्यकर्त्यांना आरोग्य तपासणी करण्यासाठी बि.पी.तपासणी यंत्र ग्रामपंचायत मार्फत देण्यात आले. यावळी ग्राम पंचायत सदस्य शारदा डाहुले, रिना कांबळे, सुरज टोमटे, हर्षला टोंगे, वैशाली पुणेकर, गजानन पाटणकर, सुनील रोंगे, दिलदार जयकर, प्रदीप गेडाम, सुरेखा इटनकर, विद्या देवाळकर, संदीप काकडे, ग्रामपंचायत अधिकारी गणेश कोकोडे यांच्यासह शाळेतील शिक्षक वृंद, गणमान्य नागरिकांची उपस्थिती होती. संचालन व आभार प्रदर्शन लिपीक संतोष निपुंगे यांनी केले.

### एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याकरिता ३० नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, ठाणे :** राज्य शासनाने दिनांक ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक (एचएसआरपी) पाटी बसविण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. अशा जुन्या वाहनांना यापूर्वी १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली होती. तथापि ही पाटी बसविण्यासाठी वाहन मालकांकडून अल्प प्रतिसाद मिळाल्याने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंतिम मुदत देण्यात येत आहे. वाहन मालकांनी वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या http://tRansport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याकरिता ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत अपॉईंटमेंट घ्यावी. त्यानंतर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) न बसविणाऱ्या वाहनांवर १ डिसेंबर २०२५ नंतर वायुवेग पथकाद्वारे नियमांनुसार कारवाई करण्यात येणार आहे. तथापि, दि. ३० नोव्हेंबर २०२५ पर्यंत एचएसआरपी बसविण्यासाठी अपॉइंटमेंट मिळालेल्या वाहनांवर कोणतीही कारवाई करण्यात येणार नाही, याची सर्व संबंधित वाहन मालकांनी नोंद घ्यावी, तरी एक एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी असलेल्या वाहनधारकांनी उच्च सुरक्षा क्रमांक पाटी वाहनावर बसविण्यात यावी, असे आवाहन सह परिवहन आयुक्त शैलेश कामत यांनी केले आहे.

### पनवेल महापालिका शाळांमध्ये संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे आयोजन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, पनवेल :** संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे सन २०२५ वर्ष हे सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती वर्ष आहे. शासन निर्देशाप्रमाणे दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी पनवेल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेच्या शाळांमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आज सर्व शाळांमध्ये पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा व ज्ञानेश्वरी ग्रंथ पालखीत ठेवून टाळ मृदुंगाच्या गजर करत पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. शेवटी पसायदान म्हणून, पसायदानाचा अर्थ शिक्षकांमार्फत सांगण्यात आला. सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी या उपक्रमात आनंदाने सहभाग घेतला.

### पालशेत बाजारपेठ येथील दहीहंडीला भाविकांची मोठी गर्दी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१६, पालशेत (गुहागर) :** राज्यात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. महाराष्ट्रातील सण, उत्सव, जल्लोषात साजरे व्हावेत, यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना नेहमीच आघाडीवर राहिली असून मनसे गुहागर संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली गुहागर तालुक्यात मनसे सैनिकांनी दहीहंडी मोठ्या उत्साहात साजरी केली. पालशेत विभाग अध्यक्ष प्रसाद विखारे यांच्यावतीने पालशेत बाजारपेठ येथे आबा विखारे यांच्या निवास्थानाजवळ दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. एकात्मतेचे दर्शन घडविणाऱ्या ह्या दहीहंडीला भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

### जि.प.प्रा.अतिट शाळेत ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अतिट येते ७९ वा स्वतंत्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालय उपकेंद्र अतिट सुशीला परांजपे विद्यालय शिरीष पवार च.ड.थ.डेप्युटी मॅनेजर उ.ड.ठ परांजपे ऑटोकास्ट प्रा.लि., गावातील सरपंच उपसरपंच आजी-माजी पदाधिकारी, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन,ग्रामस्थ,विद्यार्थी मित्र या सर्वांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. पहिली ते सातवी प्रत्येक इयत्ते तील एका विद्यार्थ्यास रोख रक्कम व आठवी ते दहावी विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून त्यांना सन्मान चिन्ह मुख्याध्यापक यांच्याकडून देण्यात आले.

## ठाण्यात विश्वविक्रम..; कोकण नगर गोविंदा पथकाने लावले १० थर

### संस्कृतीच्या दहीहंडीत घडला विश्वविक्रम - २५ लाखाचा बक्षीस जाहीर



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१६, ठाणे :** ठाण्यात दहीहंडी उत्सवाचा मोठा जल्लोष पाहायला मिळत आहे. ठाण्यात अनेक प्रसिद्ध आणि मानाच्या दहीहंड्यांची दरवर्षी चांगलीच चर्चा असते. ठाण्यातील प्रतिष्ठेच्या दहीहंड्या फोडण्यासाठी जय जवान गोविंदा पथक हजेरी लावून आपल्या नावावर विक्रम करण्याच्या तयारीत असते मात्र यंदा जय जवान गोविंदा पथकाचा हा रेकॉर्ड ब्रेक करण्यात आल्याचे पाहायला मिळाले. आज ठाण्यातील संस्कृती युवा प्रतिष्ठान आयोजित दहीहंडी उत्सवात मुंबईतील जोगेश्वरीच्या कोकण नगर गोविंदा पथकाने तब्बल १० थर रचून विश्वविक्रम केला आहे. यापूर्वी मुंबईतील जय जवान गोविंदा पथकाचा ९ थरांचा विक्रम होता. तो कोकण नगरच्या संघाने मोडीत काढला आहे. दरम्यान गेल्या अनेक वर्षापासून कोकण नगर गोविंदा पथक १० थरांचा सराव करत असल्याची माहिती मिळतेय. तर यापूर्वी २०२२ मध्ये कोकण नगर गोविंदा पथकाने ९ थारांचा विक्रम याच ठिकाणी केला होता. यावर्षी त्यांनी जिद्द आणि कठोर मेहनत आणि शिस्तीच्या जोरावर १० थर रचून यंदा आपले स्वप्न पूर्ण केले.

ठाण्याला दहीहंडीची पंढरी म्हणून ओळखली जाते जोगेश्वरी चा कोकण नगर गोविंदा पथकाने यंदा १० मानवी मनोरे रचून जय जवान गोविंदा पथकाचा विक्रम मोडीत काढला आहे . मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संस्कृती युवा प्रतिष्ठानच्या दहीहंडीत हा अनोखा विक्रम घडला आहे. मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विक्रमावर आनंद व्यक्त करत कोकण नगर गोविंदा पथकला २५ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले आहे. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांचा गजर करत त्यांचे अभिवादन केले. त्यानंतर सोशल मीडियावर विक्रमाचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल झाला.

कोकण नगर पथक आहे तरी कुठलं?

जोगेश्वरीच्या कोकण नगर गोविंदा पथकाचे प्रशिक्षक विवेरक कोचरेकर आहेत. मागील १२ वर्षापासून ते गोविंदा पथकाला प्रशिक्षण देत आहेत. कोकण नगर गोविंदा पथक हे सर्वात जुने पथक आहे. अतिशय शिस्तबद्धपणे मानवी मनोरे रचनासाठी ओळखले जाते. सर्वात प्रथम ९ थर लावण्याचा विक्रम देखील २०२२ साली कोकण नगर पथकाने केला होता. अखेर आज त्यांनी आज विश्वविक्रम करत १० थर लावले.

तुझ्या घरात नाही पाणी घागर उताणी रे गोपाळा गोविंदा रे, गोविंदा आला रे. ..आला, जरा मटकी सांभाल...., गो...गो गोविंदा, चांदी की डाल पे सोने का मोर, मज गया शोर सारी नगरी मे..... अशा गाण्यांचा ठेका धरत आणि काळजाचा ठोका चुकवेल असा थरार याची देही याची डोळा असा दहीहंडीचा उत्सव महाराष्ट्रवासीयांनी अनुभवला. .. गोविंदाच्या अजोड जिद्दीचा अद्भुत नजारा पाहून सर्वजण थक्क झाले. कुठे ८ तर लागले तर कुठे ९ थर असा अद्भुत उत्सव मुंबई सह राज्यभरात मोठ्या जल्लोषात साजरा झाला आहे. बॉलीवूडच्या स्टार मंडळींनी गोविंदालाप्रोत्साहन देण्यासाठी विशेष हजेरी लावली.

## किनवट तालुक्यात पावसाचा कहर..!

### पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे मराठवाडा विदर्भचा संपर्क तुटला





**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.१६, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यात सतत झालेल्या मुसळधार पावसामुळे, शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. हाताशी आलेली पिकं शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत चिखल झाली आहेत. अनेक गावाची घरे पडझड झाली आहे. अनेक घरातील धान्य खराब झाले. उपयोगी वस्तू पावसामुळे भिजल्या गेल्या असून जनावरे देखील मृत्यू पावली आहेत.त्यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. पैनगंगा नदी नाले तुडूंब वाहत आहे. त्यामुळे अनेक गावाचा संपर्क तुटून गेला. अचानक झालेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले. ही उणीव न भरून निघण्याजोगी आहे. महसूल विभाग व सरकारने पाऊले उचलून शेतकरी व गरजूंना तातडीची मदत करण्यात यावी कोणत्याही अटी शर्ती न घालता त्वरित पंचनामे करून सरसकट मदत जाहीर करावी.

तसेच पडझड झालेल्या कुटुंबांना मदतीचा हात देण्यात यावा अशी जनतेतून जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार तसेच मंडळ अधिकारी यांना विनंती केली आहे. झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करून शेतकऱ्यांना त्यांची संपूर्ण नुकसानभरपाई तात्काळस्वरूपात देण्यात यावी. अन्यथा संपूर्ण जनता उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर उपोषणाला बसणार असल्याचे पत्रकारांना बोलताना सांगितले.

## के.रामलू शाळेत स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून तालुक्यातील माजी सैनिकांचा सन्मान

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१५, कुंडलवाडी (नांदेड) :** दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी कुंडलवाडी शहरातील के. रामलू पब्लिक स्कूल तर्फे १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनानिमित्त तालुक्यातील माजी सैनिकांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी माजी सैनिक शंकर बोणगाळे, गंगाधर गायकवाड, शंकरराव मुंडकर, चंदर अनंतवार, संतोष उत्तरवाड, कुंडलवाडी नगरीचे भूमिपुत्र गंगाधर जालावारया माजी सैनिकांचा स्वातंत्र्यदिनानिमित्त स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. के.रामलू पब्लिक स्कूलच्या संचालिका रमा ठक्करवाड यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

राष्ट्रगीत, राज्यगीत, प्रतिज्ञा, संविधान, पसायदान, देशभक्ती गीत, १३० विद्यार्थ्यांची भाषणे, माजी सैनिकांची मनोगते, देशभक्ती गीता वरील डान्स इ.




सादरीकरण करण्यात आले. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रभात फेरीमध्ये सहभाग नोंदवून विविध वेशभूषा धारण करून लेझिम, डेम्बलची प्रात्यक्षिक दाखवली.

या प्रभात फेरीमध्ये तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्करवाड वसचिव यशवंत संगमवार संचालिका, रमा ठक्करवाड यांनी सर्व माजी सैनिकांना, शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना व सर्व गावकऱ्यांना भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश जोशी, संतोष शिवशेट्टे, डॉ. नरेश बोधनकर, डॉ.संतोष डांगे आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन कु.अवंतिका भोरे, सात्विका कोलंबरे केले तर आभार प्रदर्शन दत्ता हमंद यांनी मानले. हा सुंदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे प्रिन्सिपल जे संभाजी व्हाय प्रिन्सिपल एम.सपना व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी केले.

## बावधन भैरवनाथ देवस्थानला 'ब' दर्जा व ५ कोटींचा निधीची घोषणा - मंत्री गोरे

**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.१५, वाई (सातारा) :** वाई तालुक्याचे राजकारण बदलण्याची ताकद असणाऱ्या बावधन भूमीत अनेक नररत्न जन्मली महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध बगाड यात्रा व नवसाला पावणारा काळभैरवनाथ देव या पवित्र देवस्थानच्या विकासासाठी ब वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन ५ कोटीचा निधी व स्मशानभूमीसाठी ५० लाखाची घोषणा राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी केली. बावधन तालुका वाई येथे भाजपच्या वतीने मंत्री पदावर निवड झाल्याबद्दल जयकुमार गोरे यांचा सत्कार व तालुकाध्यक्ष दीपक ननवरे यांच्या वाढदिवस कार्यक्रमात मंत्री गोरे बोलत होते. ते पुढे म्हणाले संघर्षातून कार्यकर्ता घडतो. तो दीपकच्या रूपाने तुम्हाला मिळाला. मी ही दुष्काळी माण तालुक्यात पाण्यासाठी संघर्ष केला. म्हणून आज मंत्री पदापर्यंत पोहोचलो ग्रामीण विकास खात्यामध्ये विकासाच्या अनेक महत्त्वाच्या योजना असून त्या राबवण्यासाठी माझा निश्चित प्रयत्न राहील भाजप कार्यकर्त्याला ताकद व पाठबळ देण्याची माझी भूमिका सदैव राहील असे आश्वासन मंत्री




गोरे यांनी जनतेला दिले. पूर्व जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष अरुणादेवी पिसाळ म्हणाल्या माजी मंत्री मदन आप्पा यांच्या आशीर्वादाने बावधन परिसरातल्या जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली दीपक ननावरे व कार्यकर्त्यांच्या बळावर वाई विधानसभा निवडणुकीत ८० हजार मतापर्यंत मजल मारली यापुढे दोघेही एक संग राहून समाजसेवा करणार असल्याचे पिसाळ यांनी सांगितले दीपक नानावरे बोलताना म्हणाले बावधन गावचे प्रदेशाध्यक्ष एन एम कांबळे मंत्री मदनराव पिसाळ यांच्यासारखी मोठी माणसे गावाने दिली.

कार्यकर्त्यांचे पाठबळ हीच माझी ताकद असून त्यांच्या जीवावर घोडदौड चालू राहील गावची बगाड यात्रा राज्यात प्रसिद्ध असून खिलार बैल जोपासण्याची परंपरा असल्याने खिलार बैलांचे गाव म्हणून बावधन ला मान व दर्जा प्राप्त व्हावा. अशी मागणी दीपक दादाने बोलून दाखवली. यावेळी मंत्री जयकुमार गोरे यांचा बगाडाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. तर दीपक ननवरे यांचा वाढदिवसानिमित्त मंत्री गोरे यांच्या शुभहस्ते नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपा नेते सुनील काटकर, भाजपा महिला जिल्हाध्यक्ष सुरभी भोसले, ऍड. विजय सिंह पिसाळ, ऍड.विजय सिंह ठोंबरे, अंकिता कदम यांची भाषणे झाली. प्रास्ताविक सचिन भोसले यांनी तर सूत्रसंचालन विठ्ठल माने, सुनील कदम यांनी केले. कार्यक्रमास सूतगिरणीचे चेअरमन शशिकांत पिसाळ, भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, सरपंच वंदना कांबळे, ऋषिकेश धायगुडे, विकास पवार, अतुल पवार, रोहिदास पिसाळ, विवेक भोसले, संदीप पिसाळ, चंद्रकांत भोसले, दिगंबर रासकर, सुरज कदम, संदीप पिसाळ, तेजस मांढरे, निलेश माने उपस्थित होते.

# वाकी दरबारात स्मृतीदिन शताब्दी महोत्सव; विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१६, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील सुप्रसिद्ध चमत्कारिक वाकी दरबारात श्री संत ताजुद्दीन बाबा यांच्या १०० व्या स्मृती दिनानिमित्त १७ व १८ ऑगस्ट २०२५ रोजी शताब्दी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नुकताच वाकी दरबार ट्रस्टने जय्यत तयारीचा आढावा घेतला आहे शताब्दी महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ताजुद्दीन बाबा सुफी संत होते. ज्यांना नागपूर जिल्ह्यातील त्यांच्या भक्तांनी शहंशाह-ए-हफ्त-अकलीम (सात खंडांचा सम्राट) म्हणून संबोधले आहे.



ताजुद्दीन बाबाचा जन्म २७ जानेवारी १८६१ रोजी झाला व १७ ऑगस्ट १९२५ रोजी त्यांनी देहत्याग केला होता. त्यामूळे १७ ऑगस्ट हा दिवस ताजुद्दीन बाबा यांच्या स्मृतीदिन म्हणून साजरा केला जातो. येणाऱ्या १७ ऑगस्ट संत बाबा ताजुद्दीन यांच्या स्मृतीदिनाला १०० वर्ष पूर्ण होत आहेत.

रविवार, दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता महाअभिषेक व महापूजा होईल, ११ वाजता आचार्य प्रमोद कृष्णन यांचे प्रवचन होणार आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते कलश पूजन व स्थापना करण्यात येणार आहे. सायंकाळी ७ वाजता मुंबई येथील सुप्रसिद्ध कव्वाली गायक मुस्तफा अजीज नाजा यांचे सूफियाना कव्वालीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ ला सकाळी १० वाजता प्रभाकरदादा बोडले यांचे कीर्तन होईल. दुपारच्या सुमारास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सभागृहाचे लोकार्पण व कार्यक्रमाचे समारोप करण्यात येणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, स्वागताध्यक्ष आमदार आशिष देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून सिने अभिनेता माजी खासदार राज बब्बर हे उपस्थित राहणार आहेत. शताब्दी महोत्सवात मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री संत ताजुद्दीन बाबा वाकी दरबार ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर डहाके पाटील व ट्रस्ट कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर अग्रेसर ठेवण्यासाठी प्रयत्नशील : पालकमंत्री डॉ. उईके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकार शेतकरी, शेतमजूर, आदिवासी, दलित, वंचित, महिला, युवक – युवती यांच्यासह दुर्बल घटकाला विकासाचा केंद्रबिंदू मानून काम करीत आहे. यात चंद्रपूर जिल्हा ही मागे नाही. शासन आणि प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे नागरिकांना दिलासा मिळत आहे. असे असले तरी विकासाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये जिल्हा अग्रेसर ठेवण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, अशी ग्वाही राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली. भारतीय स्वातंत्र्याच्या ७९ व्या दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी खा. प्रतिभा धानोरकर, आ. सुधाकर अडबाले, आ.किशोर जोरगेवार, प्रभारी जिल्हाधिकारी डॉ.नितीन व्यवहारे, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते. सुरुवातीला शहिदांचे स्मरण करून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, आधुनिक कालखंडाच्या इतिहासात १८५७ च्या पहिल्या भारतीय स्वातंत्रलढ्याचे पडसाद चंद्रपूर जिल्ह्यातही पडले. आदिवासींच्या जमिनीवर इंग्रजांनी जबरदस्तीने कब्जा केल्यानंतर शहीद क्रांतीवीर बाबुराव शेडमाके यांनी इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारले. १९४२ च्या चिमूर क्रांतीमुळे चंद्रपूर हे केवळ देशातच नव्हे तर संपूर्ण जगात नावारुपास आले. आपल्याला हे स्वतंत्र शहिदांच्या बलिदानातुन मिळाले आहे. त्यामुळे स्वातंत्र्याचे सुराज्यात रुपांतर करण्यासाठी शासन- प्रशासन कटिबध्द आहे. चंद्रपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या महसूल सप्ताहादरम्यान ७३ महाराजस्व अभियान शिबिरांतर्गत ५ हजार ३९२ विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. जिल्ह्यात ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी नोंदणी झालेल्या शेतक-यांची संख्या ३ लक्ष २ हजार ८८२ असून ही टक्केवारी ९७.८९ आहे.

पालकमंत्री डॉ.उईके म्हणाले, 'प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान' अंतर्गत आदिम जमातींच्या नागरिकांकरिता ४८२ घरकुल मंजूर करण्यात आले आहे. 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान' अंतर्गत जिल्ह्यात एकूण ८३ शिबिर आयोजित करण्यात आले. यात विविध प्रकारचे १५ हजार ८५३ दाखले देण्यात आले. आदिवासी भगिनींच्या सक्षमीकरणासाठी आणि सन्मानासाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण योजना' राबविण्याचा धोरणात्मक निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. प्रधानमंत्री



किसान सन्मान योजनेचा ४९ कोटी ७० लक्ष रकमेचा २० वा हप्ता जिल्ह्यातील २ लक्ष ४८ हजार ५४० शेतकऱ्यांच्या खात्यात वितरित करण्यात आला आहे. माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत जिल्हयातील सर्व ८२४ ग्रामपंचायतीची नोंदणी करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत एकूण २३२ गावांची निवड करण्यात आली आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना टप्पा दोन अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यातील ५६१ गावांची निवड झाली आहे. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा एकूण १३७२ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे. रमाई आवास शहरी व ग्रामीण योजनेचे एकूण ८४७ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहे.

शासनाने ६ ऑगस्ट, २०२५ पासून सुरू केलेल्या 'मुख्यमंत्री ग्रामसमृध्द पंचायतराज अभियानात' सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी उस्फूर्त सहभाग नोंदवावा. तसेच दुस-यांना जीवनदान देण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी अवयवदान व नेत्रदानासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले.तत्पुर्वी मान्यवरांच्या हस्ते 'नशामुक्त अभियान'च्या फलकाचे अनावरण करण्यात आले. तसेच यावेळी तंबाखू सेवन प्रतिबंधाबाबत शपथ घेण्यात आली.

**विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या नागरिकांचा सन्मान**

यावेळी मान्यवरांच्या हस्ते वीरपत्नी वैक्कमा भिमनपाल्लीवार, वीरनारी अरुणा रामटेके, पार्वती डाहुले, छाया नवले, वीरपिता बाळकृष्ण नवले, नायब सुभेदार शंकर मेंगरे यांच्यासह डॉ. संदीप पिपरे, डॉ. भास्कर सोनारकर, आर.आर. आबा सुंदरग्राम योजनेंतर्गत जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल ग्रामपंचायत वांद्रा (ता. ब्रम्हपुरी), कळमना (राजुरा) यांचा तसेच अवयवदान केलेल्या नागरिकांचे नातेवाईक ज्ञानेश्वर बोबडे, माधुरी भटवलकर, भारती नवघरे, महादेव जंपलवार, प्रतिक पारखी, नंदू हेमणे, एकांश कोटगले यांचा मान्यवरांनी शाल, सन्मानपत्र देऊन सत्कार केला.

# केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालयात ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१५, मुदखेड (नांदेड) :** केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या केंद्रीय प्रशिक्षण महाविद्यालय, मुदखेड येथे ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ८ वाजता, संस्थेचे महानिरीक्षक आणि प्राचार्य ख्वाजा सज्नौद्दीन यांनी क्वार्टर गार्ड येथे मानवंदना घेतली आणि नंतर ध्वजारोहण केले. सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देताना प्राचार्यांनी त्याचे महत्त्व अधोरेखित केले.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यलढ्यातील प्राणाची आहुती शूर स्वातंत्र्यसैनिकांना त्यांनी आदरांजली वाहिली.आपण स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरणेचे स्रोत मानले पाहिजे आणि आपल्या जीवनाच्या,समाजाच्या आणि देशाच्या उन्नतीसाठी समर्पितपणे काम केले पाहिजे. जेणेकरून आपण स्वतःचा, समाजाचा आणि राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधू शकू आणि देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जाऊ शकू. त्यांनी असेही सांगितले की,आपला देश एक विकसित राष्ट्र बनण्यासाठी आपण जीवनाच्या सर्व क्षेत्रात



मुदखेड तालुक्यातील विविध जागी ध्वजारोहण करण्यात आले तहसील कार्यालय येथे ही प्रशासकीय ध्वजारोहण तहसीलदार आनंद देऊळगावकर यांच्या हस्ते पार पडला. त्याचबरोबर नगरपरिषद, शाळा, महाविद्यालय, तालुक्यातील ग्रामपंचायती कार्यालय भाजपा पक्ष कार्यालय काँग्रेस पक्ष कार्यालय या ठिकाणी सुद्धा ध्वजारोहण करण्यात आले.

प्रामाणिकपणा आणि समर्पणाने काम केले पाहिजे.

यावेळी प्राचार्य यांनी राष्ट्राच्या महामहिम राष्ट्रपतींकडून विविध पदके प्राप्त करणाऱ्या अधिकाऱ्यांची,कर्मचाऱ्यांची नावे जाहीर केली आणि त्यांना त्यांच्या शौर्यासाठी राष्ट्रपती शौर्य पदकांनी सन्मानित करण्यात आल्याची माहिती दिली. कार्यक्रमानंतर महानिरीक्षक आणि प्राचार्य यांनी उपस्थित सर्व अधिकारी, सैनिक आणि माध्यम प्रतिनिधींना मिठाई वाटली. स्वातंत्र्यदिनानिमित्त संस्थेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये 'ॲट होम' पार्टीसाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांनी संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आमंत्रित करणे, कर्मचाऱ्यांमध्ये व्हॉलीबॉल स्पर्धा, मुलांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम, संयुक्त जेवणाचे आयोजन आणि सर्व इमारतींवर भव्य विद्युत सजावट यांचा समावेश होता. या प्रसंगी कमांडंट व्ही.पी.त्रिपाठी, डेप्युटी कमांडंट अरुण कुमार, डेप्युटी कमांडंट मोहम्मद शाहनेवाज, डेप्युटी कमांडंट करणजीत सिंग, असिस्टंट कमांडंट यू.टी.साखरे, असिस्टंट कमांडंट (मंत्रालयीन), डॉ.सी.संजीवन, वैद्यकीय अधिकारी, इतर अधीनस्थ अधिकारी, कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# महाबळेश्वर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१५, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक, सुभाष चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच नगरपालिका कार्यालय प्रांगणात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सर्वात प्रथम सकाळी तहसिलदार कार्यालयात तहसीलदार सचिन मस्के यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यावेळी महाबळेश्वर पोलीस पथकाने मानवंदना दिली. याचबरोबर पंचायत समिती, पोलीस स्टेशन, बांधकाम विभाग, वन विभाग, शाळांसह ठिकठिकाणी प्रमुखांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच महाबळेश्वर नगरपालिका प्रांगणात प्रशासक तथा मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शहरातील माजी लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित व्यक्ती, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरिक नगरपालिका कर्मचारी वर्ग व इतर मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष किसन शिंदे, युसुफ शेख, माजी उपनगराध्यक्ष अफजल सुतार, प्रकाश पाटील, माजी नगरसेवक रवींद्र कुंभारदरे, संदीप साळुंखे, संतोष (आबा) शिंदे, अर्बन बँक व्हा. चेअरमन शरद बावळेकर, संचालक चंद्रकांत




बावळेकर, अँड.सतीश ओंबळे, दत्तात्रय वाडकर, मनिषा पारठे,संपत जाधव, जावेद वलगे, अनिल साळुंखे, मुख्य व्यवस्थापक फकीर वलगे,अँड.विजय दस्तुरे, अँड. संजय जंगम, विशाल तोष्णीवाल, विजय नायडू, राजेंद्र पवार, तोफिक पटवेकर, राजा गुजर,शंकर ढेबे,न.पा. मुख्य लिपिक आबा ढोबळे, नगरपरिषद विभागप्रमुख मुरलीधर धायगुडे, सचिन कदम,अमित माने, प्रदीप बोरगे, मिलिंद गायकवाड, कल्याण हिवरे तसेच सर्व शाळांचे मुख्याध्यापक व विद्यार्थी तसेच नागरिक उपस्थित होते.

# थोडक्यात

## 'रिक्षा चालक-मालक एकता युनियन'च्या वतीने रिक्षा स्टॅन्ड येथे ध्वजारोहण संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, वाशी (नवी मुंबई) :** भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त वाशी स्टेशन रिक्षा स्टॅन्ड येथे 'रिक्षा चालक-मालक एकता युनियन' च्या वतीने ध्वजारोहण कार्यक्रम मोठ्या हर्ष उत्साहात संपन्न झाला. नवी मुंबई महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांच्या हस्ते सन्मानपूर्वक ध्वजारोहण करण्यात आले. तसेच युवा नेता निशांत भगत यांच्या उपस्थितीत राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. सदर कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी उपस्थिती दर्शवित रिक्षा चालकांना मार्गदर्शन केले, तसेच स्वातंत्र्यदिनाचे ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व प्रभावीपणे स्पष्ट केले. सरते शेवटी वंदे मातरम या प्रेरणादायी गीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली, तसेच उपस्थितांना गोड-धोड पदार्थ देऊन त्यांचे आदरातिथ्य करण्यात आले.रिक्षा चालक-मालक एकता युनियन'च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी यावेळी आवर्जून आपली उपस्थिती दर्शविली. त्यात अविनाश कदम (अध्यक्ष), दीपक निगडे (उपाध्यक्ष), सुनील बोर्डे (मार्गदर्शक), नंदू पाटील (मार्गदर्शक), शुभम चोरगे (सरचिटणीस) अनिल चौधरी (खजिनदार) तसेच कार्यकारी सदस्य आनंदा नाईकरे, डी.के. पोळ, विजय कडवेकर, गणेश निकम, अशोक अलुगडे, सुरज यादव त्याचप्रमाणे अनेक रिक्षा चालक-मालक आणि पॅसेंजर व नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.सदर कार्यक्रमात सर्व जातीचे, धर्माचे, प्रांताचे, वर्गांचे, तसेच स्त्री - पुरुष यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम संपन्न केला. जणू काही कार्यक्रमाच्या जागी भारतीय लोकशाहीच अवतरली होती. स्टेशन वरून रेल्वेने जाणाऱ्या आणि येणाऱ्या प्रवाशांनी सुद्धा थांबून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली व राष्ट्रगीतामध्ये आपला सूर मिसळला.या कार्यक्रमाद्वारे रिक्षा चालक - मालकच नव्हे तर, एकता युनियन च्या एकात्मतेचे, देशभक्तीचे आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडून आले.

## राष्ट्रभक्तीने भारलेल्या सायकल रॅलीतून 'घरोघरी तिरंगा' अभियानाचा जागर



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने 'घरोघरी तिरंगा – घरोघरी स्वच्छता' अभियानात केंद्र व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध उपक्रम राबविण्यात येत असून आज स्वातंत्र्यदिनानिमित्त तिरंगा सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. महापालिका मुख्यालयात आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी झेंडा दाखविल्यानंतर तिरंगा सायकल रॅलीस प्रारंभ झाला. यावेळी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ.राहुल गेठे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे, शहर अभियंता शिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व स्मिता काळे, अति.शहर अभियंता अरविंद शिंदे आणि इतर विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते. सायकल हे प्रदूषण विरहित वाहन असून सायकल रॅलीद्वारे 'भारतमाता की जय' अशा घोषणा देत राष्ट्रप्रेमाचे महती दर्शविण्यात आली तसेच पर्यावरणाचे महत्व ही अधोरेखित करण्यात आले. ७० हून अधिक सायकलपटूंनी या तिरंगा रॅलीमध्ये उत्साहाने सहभागी होत सीवूड ग्रँड सेंट्रल नेक्सस मॉल पर्यंत देशप्रेम व स्वच्छताविषयक जनजागृती केली.

## विंचूर येथे विविध ठिकाणी ७९ वा भारतीय स्वातंत्र्यदिन सपंन्न



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विंचूर गावात देशभक्तीच्या वातावरणात विविध ठिकाणी ध्वजारोहणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय, ग्रामपंचायत कार्यालय तसेच नेहरू चौक येथे स्वतंत्रपणे ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच सचिन दरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमात सहभाग घेतला. नेहरू चौक येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीतग्रामपंचायत सदस्य संतोषजी जाधव यांच्या हस्ते ध्वज फडकावण्यात आला. देशाच्या एकतेचा आणि प्रगतीचा संकल्प यावेळी सर्वांनी केला. संपूर्ण गावात सकाळपासून देशभक्तीपर गाणी, सजावट व तिरंग्यांच्या फडफडीमुळे वातावरण भारावून गेले होते.

## ग्रामीण रुग्णालय मनोर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१५, पालघर :** पालघर मनोर रुग्णालय येथे शुभहस्ते ध्वजरोहण डॉ.मनाली कोकाटे यांनी केला आहे. सदर कार्यक्रमात रुग्णकल्याण समिती प्रतिनिधी प्रमुख विनायक भोईर उपस्थितीत होते. उपस्थिती डॉ.नागेंद्र प्रसाद, डॉ. मिनाक्षी खडके आणि सहाय्यक अधिक्षक विष्णू सांबरे व इतर कर्मचारी सुनील भोईर, मनीषा संख्ये, श्याम चव्हाण, दिक्षा घुगे, सिमा डोके, निकिता जाधव, पुजा म्हात्रे, ईश्वर, रुचिता जोशी, उन्नती घरत, उज्वला खंडारे, कीर्तना साबरे, दिपाली काडेला, निकिता दळवी, माधुरी पडवले, नुतन पाटील, प्रकाश भुयाळ, दिनेश गोळे, ज्ञानेश्वर जाधव, प्रविण रुवेकर, मोनिष कुवर, श्री.बेंदर, श्री.गिते, अमोल घुले, अमित गायकवाड, शांतराम पाटील व इतर कर्मचारी उपस्थित होते. अशा प्रकारे ध्वजरोहण करण्यात आले .